विशेष लेख क्र. २९६ | २१ आश्विन १९२८ शके (सायं. ५.३० वा.)
शुक्रवार, दि.१३ ऑक्टोबर २००६

**पर्यावरण रक्षणासाठी तागाचा प्रसार**

*केंद्रीय वस्त्रोद्योग खात्याच्या ताग उत्पादक विकास मंडळाच्या वतीने दादरमधील डिसिल्व्हा ट्रस्टच्या सभागृहात तागाच्या वैविध्यपूर्ण वस्तूंचे प्रदर्शन गेल्या गुरुवारपासून सुरु झाले आहे. १८ ऑक्टोबरपर्यंत प्रदर्शन चालणार आहे. या निमित्त विशेष लेख...*

प्लास्टिक वापराचे अनेक तोटे मानवाला सोसावे लागत आहेत. प्लास्टिक नैसर्गिक रितीने नष्ट होत नाही आणि जाळून नष्ट केले तरी हानीकारक वायूंची निर्मिती त्यापासून होते. यापासून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावता येत नाही. शिवाय पावसाळ्यात प्लास्टिकच्या पिशव्या नाल्यांत तुंबल्यामुळे काय संकट उद्‌भवू शकते, याचा अत्यंत भयावह अनुभव मुंबईकरांनी घेतला आहे. सद्यस्थितीत वाढते प्रदूषण आणि त्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी हा जागतिक स्तरावर चिंतेचा विषय झाला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावणसुसंगत साधनांचा शोध व निर्मिती या बाबींवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

प्लॅस्टिकच्या पिशव्यांना सर्वात चांगला पर्याय म्हणून आज तागाकडे पाहिले जात आहे. कच्च्या तागाच्या उत्पादनात भारत अग्रेसर आहे. तागाचे सर्वाधिक उत्पादन भारतात होते. तागाच्या पिशव्या, कापड यांची जागतिक मागणी पुरविण्याची क्षमताही भारतीय ताग उद्योगात आहे. दर्जा राखून वैविध्यपूर्ण ताग उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या व्यावसायिकांची संख्याही देशात लक्षणीय आहे. या बाबतीतही भारत अग्रस्थानी आहे. तागाच्या अधिकाधिक दर्जेदार उत्पादनांसाठी कृषी संशोधन तसेच तांत्रिक बाबींविषयीही संशोधन व विकास या संदर्भातही देशात मोठया प्रमाणावर काम सुरु आहे.

तागापासून पिशव्या, पोती यांच्या निर्मितीपुरताच भारतीय व्यवसाय आता मर्यादित राहिलेला नाही. विविध हस्तकलांच्या माध्यमातून तसेच यांत्रिक पध्दतीनेही तागापासून अनेक वैविध्यपूर्ण वस्तूंची निर्मिती केली जात आहे. यामध्ये आकर्षक पर्स, बॅग, भेटवस्तू, बाजारासाठी पिशव्या, आकर्षक वॉलपीस, पादत्राणे, पायपोस, सतरंज्या, चादरी, उशा, संपूर्ण फ्लोअर कव्हरिंग, अन्य गृह सजावटीच्या वस्तू, कपडे तसेच सौंदर्य आभूषणे यांचाही समावेश आहे. या वस्तूंना ग्राहकांची पसंतीही लाभत आहे, ही सर्वात जमेची बाजू आहे.

या ताग व्यवसायाच्या भरभराटीसाठी केंद्रीय वस्त्रोद्योग खात्याचे ताग उत्पादक विकास मंडळ (जेएमडीसी) आणि नॅशनल सेंटर फॉर ज्यूट डायव्हर्सिफिकेशन (एनसीजेडी) यांच्या वतीने विविध उपक्रम राबवले जातात. ताग उत्पादक, व्यावसायिक, विक्रेते आणि निर्यातदार या सर्वांमध्ये समन्वय साधणे, त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणे, आवश्यक तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षणाची उपलब्धता करणे, मार्गदर्शन करणे अशी कामे या संस्थांमार्फत करण्यात येतात. स्थानिक तसेच परकीय बाजारपेठांत निर्यातीसाठीही विशेष प्रयत्न केले जातात.

...२/

जेएमडीसीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच तागविषयक उद्योगांची संख्या वाढीस लागली आहे. या क्षेत्रात २००१-०२ मध्ये साधारण दीड लाख रोजगार उपलब्ध होते. ती संख्या २००३-०४ मध्ये एक लाख ८३ हजार १९९ इतकी झाली. असंघटित अथवा स्वतंत्र उद्योग करणा-यांची संख्याही लक्षणीय आहे. या कालावधीत ताग उत्पादनांची विक्रीही ९६० कोटींवरुन १२९९ कोटींवर गेली.

भारतात दरवर्षी तागाच्या वस्तूंचे वार्षिक उत्पादन साधारणतः सोळा लाख टन इतके होते. त्यापैकी सरासरी दोन लाख पाच हजार टनांच्या वस्तूंची निर्यात केली जाते. यातून सुमारे ७८०० दशलक्ष रुपयांचे उत्पन्न मिळते. २००५-०६ या वर्षात सुमारे ११ हजार ८६२ दशलक्ष रुपयांच्या ताग उत्पादनांची निर्यात करण्यात आली. यंदा निर्यातीत २००४-०५ च्या तुलनेत सुमारे ४०० दशलक्ष रुपयांची वृध्दी झाली. या निर्यातीत तागाच्या पिशव्या, पोती बॅग आदी पारंपरिक वस्तूंखेरीज अन्य वैविध्यपूर्ण वस्तूंच्या निर्यातीचा वाटा सुमारे २६ टक्के म्हणजे ३१२५ दशलक्ष रुपये इतका होता.

एकूणच जागतिक स्तरावर पर्यावरण-सुसंगत व प्रदूषणविरहित तागाविषयी जनमत अनुकूल होत असताना देशांतर्गत पातळीवरही प्रदर्शने, विक्री आणि सहज व स्वस्तात उपलब्धतेसाठी ताग उत्पादक विकास मंडळाने प्रयत्न चालविले आहेत. त्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून दादर (पश्चिम) येथील एस.के. बोले रोडवरील डॉ.अंथोनी डिसिल्वा ट्रस्ट सभागृहात मंडळाच्या वतीने तागाच्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरविले आहे. १८ ऑक्टोबर, २००६ पर्यंत सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत प्रदर्शन खुले राहणार आहे.

ताग व्यवसायावर आधारित शेती, उद्योग व रोजगार यांना नवसंजीवनी देण्यासाठी तसेच पर्यावरणरक्षकाची भूमिका कर्तव्यदक्षपणे निभावण्यासाठी **पर्यावरण रक्षणासाठी तागाचा प्रसार** हे ब्रीद घेऊन वाटचाल करणाऱ्या या परंपरेचे आपणही पाईक होण्याची आज खरी गरज आहे.

- **आलोक जत्राटकर,**
सहायक संचालक (माहिती),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

०००००००००